ePaper

## पुणे जिल्ह्यातील 27 शाळा बोगस; शाळांमध्ये प्रवेश न घेण्याचे जिल्हा परिषदेचे आवाहन



| वर्ष - 6 | अंक - 52 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत


- 'ज्यांची डोकी जागेवर नाहीत, असे निवडणुकीच्या रिंगणात उतरलेत'
- ठाकरे सरकारमुळे पेट्रोल-डिझेलच्या महागाईचा महाराष्ट्रात उच्चांक!
- संभाजीराजेंसाठी 'अब दिल्ली दूर' !


www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 27 मे 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



नरेंद्र मोदी सरकारचा पायाच खोटेपणावर उभारलेला आहे. २०१४ साली वारेमाप आश्वासने देत सत्तेवर आले पण आतापर्यंत एकही आश्वासन हे सरकार पूर्ण करु शकले नाही. महागाईवर नियंत्रण मिळवण्याचे आश्वासन दिले पण प्रत्यक्षात महागाई दुपट्टीने वाढली. स्वयंपाकाचा गॅस सिलिंडर ४५० रुपये होता तो आज एक हजारांपेक्षा जास्त महाग झाला आहे. पेट्रोल ६५ रुपये लिटर होते ते आज ११० रुपये लिटर झाले आहे.

**-नाना पटोले,** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष

ईडी अधिकाऱ्यांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे मी दिली आहेत. मी पहिल्यापासून सांगतोय की ज्या यंत्रणा मला कुठलाही प्रश्न विचारतील त्याला उत्तर देण्यास मी बांधील आहे. पूर्वीही उत्तरे दिली होती. आजही दिली. पुढेही उत्तरे देण्याची माझी तयारी आहे. समुद्रात जर बंद रिसॉर्टचे सांडपाणी जात असेल तर त्यात मनी लॉन्ड्रिंगचा मुद्दा येतो कुठे. याचा खुलासा कोर्टात होईल. मी कायद्याला सामोरा जायला तयार आहे.

**- अनिल परब,** परिवहन मंत्री



## शॉर्ट न्यूज »

### पुण्यातील व्यवसायिक अविनाश भोसलेंना सीबीआयकडून अटक

**| पुणे |** पुण्यातील बांधकाम व्यावसायिक अविनाश भोसले यांना सीबीआयकडून अटक करण्यात आली आहे.



डीएचएफएल प्रकरणी सीबीआयने ही कारवाई केली आहे. गेल्या महिन्यात भोसले आणि मुंबईस्थित बांधकाम व्यावसायिक विनोद गोएंका आणि शाहिद बलवा यांच्यासह आणखी दोन व्यावसायिकांशी संबंधित ठिकाणांवर सीबीआयने छापा टाकला होता. त्यानंतर आज त्यांना अटक करण्यात आली आहे. येस बँक, डीएचएफएल फसवणूक प्रकरणाच्या चौकशीच्या संदर्भात केंद्रीय अन्वेषण विभागाने मुंबई आणि पुण्यातील 8 ठिकाणी ३० एप्रिलला शोधमोहीम राबवली होती.

# पिंपरी-चिंचवड महापालिका शहर अभियंतापदी अखेर मकरंद निकम!

## महापालिका आयुक्त राजेश पाटील यांचा स्वागतार्ह निर्णय; राजकीय रस्सीखेचमध्ये निकम यांनी मारली बाजी

**| पिंपरी | महाईन्यूज |**

पिंपरी-चिंचवड महापालिका शहर अभियंतापदी अखेर मकरंद निकम यांची नियुक्ती करण्यात आली. तसे आदेश महापालिका आयुक्त राजेश पाटील यांनी जारी केले आहेत. शहराच्या विकासाशी संबंधित ''शहर अभियंता' या महत्त्वाच्या पदावर महापालिकेतीलच अनुभवी अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी, अशी मागणी भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांनी केली होती. त्याला आयुक्त व प्रशासक राजेश पाटील यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून, राज्य शासनाकडून आलेल्या अधिकाऱ्यांचा भ्रमनिरास झाला आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेचे शहर अभियंता राजन पाटील 31 मे 2022 रोजी सेवानिवृत्त होणार असल्याने नवीन शहर अभियंता कोण होणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. सह शहर अभियंता मकरंद निकम, श्रीकांत सवणे आणि राज्य शासनाकडून प्रतिनियुक्तीवर आलेले स्मार्ट सिटीचे सह शहर अभियंता अशोक भालकर यांच्यात रस्सीखेच सुरू होती. दरम्यान, महापालिकेतील सेवा ज्येष्ठतेनुसार मकरंद निकम प्रबळ दावेदार होते. त्यातच भाजपा शहराध्यक्ष महेश लांडगे



यांनी महापालिकेतील अधिकाऱ्याला पदोन्नती द्यावी, अशी मागणी केली होती. तसेच, उच्च न्यायालयात दाखल असलेल्या रिट पिटशनमध्ये झालेल्या निर्णयानुसार, रामचंद्र जुंधारे यांची सहशहर अभियंतापदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांना १ जून २०२२ पासून पदोन्नती देण्यात येणार आहे.

### आयुक्तांच्या निर्णयाचे कर्मचाऱ्यांकडून स्वागत...

- विशेष म्हणजे, राज्य शासनाच्या माध्यमातून प्रतिनियुक्तीवर आलेले अशोक भालकर यांनी राज्यातील वरिष्ठ पातळीवर 'फिल्डिंग' लावली होती. भालकर हे तीन वर्षांपूर्वी शासनाकडून पिंपरी-चिंचवड महापालिकेत प्रतिनियुक्तीने आले आहेत.
- भालकर यांच्याकडे स्मार्ट सिटीच्या सह शहर अभियंता पदाची जबाबदारी देण्यात आली आहे. त्यांच्या प्रतिनियुक्तीचा कालावधी संपला आहे. तसेच त्यांना सह शहर अभियंता पदावरच पदोन्नती मिळावी, यासाठी शहरातील आणि राज्यातील राजकीय व्यक्तींचा आग्रह होता. मात्र, अखेर आयुक्तांनी राजकीय दबाव झुगारुन महापालिकेतील अधिकाऱ्याला संधी दिल्याने या निर्णयाचे महापालिकेतील कर्मचाऱ्यांकडून स्वागत होत आहे.

# थेरगावातील जलवाहिनीचे काम निकृष्ठ दर्जाचे !

## खासदार श्रीरंग बारणे आक्रमक; ठेकेदारावर कारवाई करण्याची सूचना

**| पिंपरी | महाईन्यूज |**

निगडीतील सेक्टर 23 ते थेरगावातील पाण्याच्या टाकीपर्यंतच्या एक मीटर व्यासाच्या पिण्याच्या पाण्याच्या पाईपलाईनचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे झाले आहे. मागील महिन्याभरापासून या पाईपलाईनमधून हजारो लीटर पाणी वाया जात आहे. एकीकडे करदात्या



नागरिकांना पिण्यासाठी पाणी मिळत नसताना दुसरीकडे निकृष्ट कामामुळे हजारो लीटर पाण्याची नासाडी होत आहे. ठेकेदार महापालिका अधिकाऱ्यांनाही दाद देत नाही. त्यामुळे तातडीने व्हीआयएल या ठेकेदारावर कारवाई करण्याची सूचना मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी आयुक्तांना केली आहे. याबाबत आयुक्त तथा प्रशासक राजेश पाटील यांना निवेदन दिले आहे. त्यात खासदार श्रीरंग बारणे यांनी म्हटले आहे की, पिंपरी महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या वतीने निगडीतील सेक्टर 23 ते थेरगावातील पाण्याच्या टाकीपर्यंत एक मीटर व्यासाच्या पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन टाकण्याचे काम हाती घेतले होते. महापालिकेने चार वर्षांपूर्वी हे काम व्हीआयएल या ठेकेदाराला दिले. काम पूर्ण झाल्यामुळे महापालिकेने महिन्याभरापासून पाईपलाईनमधून पाणी सोडण्यास सुरुवात केली.

- याबाबत मी स्वत: आपणाकडे दोनवेळा तक्रार केली. परंतु, आजपर्यंत कोणतीही कारवाई केली नाही. महापालिकेने कोट्यवधी रुपये खर्च करुनही व्हीआयएल या ठेकेदाराने निकृष्ठ दर्जाचे काम केल्याने हजारो लीटर पाण्याती गळती होत आहे. स्थानिक नागरिकांकडूनही पाणीपुरवठा विभागाच्या अधिका-यांकडे सातत्याने तक्रार केली जात आहे. परंतु, संबंधित ठेकेदार महापालिका प्रशासनाला दाद देत नाही. पाईपलाईन तातडीने दुरुस्त करावी. तोपर्यंत पाईपलाईनमध्ये पाणी सोडू नये. व्हीआयएल या ठेकेदारावर तत्काळ कारवाई करावी, अशी सूचना खासदार बारणे यांनी केली आहे. हजारो लीटर पाणी वाया जात असताना प्रशासन गप्प का? मागील सत्ताधा-यांच्या नियोजनशून्य कारभारामुळे अडीच वर्षांपासून पिंपरी-चिंचवडकरांना दिवसाआड पाणीपुरवठ्याला सामोरे जावे लागत आहे. सध्या अनेक ठिकाणी पुरेसा पाणीपुरवठा होत नाही.

## शॉर्ट न्यूज »

### लग्नघरात चोरी; अकरा लाखांचा ऐवज लंपास ; गणेश पेठेतील घटना

पुणे । महाईन्यूज ।

**लग्नघरातून** चोरट्यांनी दहा लाखांची रोकड तसेच दागिने असा दहा लाख ८२ हजारांचा ऐवज लांबविल्याची घटना मध्यभागातील गणेश पेठेत घडली. सदनिकेच्या बाहेर लावलेले सीसीटीव्ही कॅमेरे चोरट्यांनी चोरल्याचे उघडकीस आले आहे. याबाबत मोहम्मद शेख (वय ४३, रा. एसआरए इमारत, नाडेगल्ली, गणेश पेठ) यांनी या संदर्भात फरासखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. शेख यांचा भंगार माल खरेदीचा व्यवसाय आहे. शेख यांच्या भाच्याचा विवाह असल्याने त्यांनी घरातील कपाटात दहा लाख २५ हजारांची रोकड ठेवली होती. लग्नाच्या खरेदीच्या गडबडीत शेख कुटुंबीय होते. चोरट्यांनी शेख यांच्या सातव्या मजल्यावरील सदनिकेचे कुलुप तोडले. कपाटातील दहा लाख २५ हजारांची रोकड, सोन्याचे दागिने असा दहा लाख ८२ हजारांचा ऐवज लांबविला. चोरट्यांनी शेख यांच्या सदनिकेच्या बाहेर लावलेले सीसीटीव्ही कॅमेरे तसेच चित्रीकरण साठवणारे डीव्हीआर यंत्रही चोरुन नेल्याचे पोलिसांनी सांगितले.

### राजगड सहकारी साखर कारखान्याची निवडणूक आम्ही सोशल मीडियावरही जिंकू : दिनकर धरपाळे

# ‘ज्यांची डोकी जागेवर नाहीत, असे निवडणुकीच्या रिंगणात उतरलेत’

## विरोधी पक्षातील नेत्यांनी 7 जागांसाठी निवडणूक

। वेल्हे। महाईन्यूज । प्रतिनिधी

"ज्यांची डोकी जागेवर नाहीत; असे उमेदवार राजगड सहकारी साखर कारखाना निवडणुकीच्या रिंगणात आहेत. ही निवडणूक म्हणजे आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीची रंगीत तालीम आहे. विरोधी पक्षातील नेत्यांनी सात जागांसाठी ही निवडणूक कारखान्यावर लादली असून माजी मंत्री अनंतराव थोपटे आणि आमदार संग्राम थोपटे यांच्या कार्यामुळे राजगड सहकारी कारखान्याची निवडणूक आम्ही सोशल मीडियावरही जिंकू," असा विश्वास राजगड सहकारी साखर कारखान्याचे माजी उपाध्यक्ष तथा विद्यमान जिल्हा परिषद सदस्य दिनकर धरपाळे यांनी व्यक्त केला.

भोर तालुक्यातील राजगड सहकारी साखर कारखान्याच्या काँग्रेसप्रणित राजगड सहकार पॅनेलचा प्रचार वेल्हे तालुक्यात करण्यात येत आहे. या प्रचारादरम्यान आंबवणे येथील सभासद दौरा भेटीदरम्यान कारखान्याचे माजी उपाध्यक्ष धरपाळे हे बोलत होते.



या वेळी दिनकर धरपाळे म्हणाले की, राजगड सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीचा निकाल आत्ताच लागला आहे. विरोधी पक्षातील उमेदवार कोठेही फिरताना दिसत नसल्याने काँग्रेस प्रणित पॅनेलचा विजय निश्चित आहे. ही निवडणूक म्हणजे आगामी जिल्हा परिषद, पंचायत समितीची रंगीत तालीम आहे.

### यांची होती उपस्थिती

यावेळी काँग्रेसचे वेल्हे तालुकाध्यक्ष नाना राऊत, सभापती दिनकर सरपाले, जिल्हा परिषद सदस्य अमोल नलावडे, कारखान्याचे माजी संचालक प्रताप शिळीमकर, माजी तालुकाध्यक्ष दिलीप लोहकरे, काँग्रेस सेवादलाचे अध्यक्ष आकाश वाडघरे, युवक काँग्रेसचे अध्यक्ष शिवराज शेंडकर, उपाध्यक्ष गणेश जागडे, वांगणीचे उपसरपंच शिवाजी चोरघे, अंबवणेचे माजी सरपंच विलास तळेकर, बबन तळेकर, ज्ञानेश्वर तळेकर, तानाजी कचरे आदींसह सभासद उपस्थित होते .

# महापालिका निवडणुकीसाठी मंगळवारी आरक्षण सोडत



। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

आगामी महापालिका निवडणुकीसाठी अनुसूचित जाती (महिला), अनुसूचित जमाती (महिला) आणि सर्वसाधारण महिलांसाठीचे आरक्षण रविवारी निश्चित करण्यात येणार आहे. त्यासाठीचा कार्यक्रम महापालिकेच्या निवडणूक शाखेकडून जाहीर करण्यात आला आहे. स्वारगेट येथील गणेश कला क्रीडा रंगमंच येथे मंगळवारी (३१ मे) सकाळी दहा वाजता आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे.

महापालिकेची अंतिम प्रभाग रचना जाहीर झाली आहे. सर्वोच्च न्यालयाच्या आदेशानुसार आगामी निवडणूक इतर मागासवर्गीयांच्या (ओबीसी) आरक्षणाशिवाय होणार आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनाकडून अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीसाठीचे प्रभागही निश्चित करण्यात आले आहेत. या प्रभागांमध्ये महिलांसाठीचे राखीव जागांवरील आरक्षण निश्चित केले जाणार आहे. आरक्षण सोडतीसाठी राजकीय कार्यकर्ते, पदाधिकारी, इच्छुकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता असल्याने गणेश कला क्रीडा रंगमंच येथे कार्यक्रम घेण्यात येणार आहे.

# पुणे जिल्ह्यातील २७ अनधिकृत शाळांची मान्यता काढली

## जिल्हा परिषद प्रशासनाकडून जाहीर

पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी

जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाची परवानगी न घेता बेकायदा २७ शाळा जिल्ह्यात सुरू असल्याचे उघडकीस आले आहे, असे जिल्हा परिषदेच्यावतीने जाहीर करण्यात आले आहे. संबंधित शाळांवर कारवाई करण्यात आली असून त्या शाळांची मान्यता काढण्यात आली आहे. तसेच या शाळांमधील विद्यार्थ्यांना अन्य शाळांमध्ये प्रवेश देण्याची प्रक्रिया करण्यात येणार असल्याचे जिल्हा परिषद प्रशासनाकडून बुधवारी जाहीर करण्यात आले.जिल्ह्यात शाळा सुरू करण्यापूर्वी शिक्षण विभागाची परवानगी घेणे आवश्यक असते. मात्र, जिल्ह्यातील अनेक शाळांनी परवानगी न घेता शाळा सुरू ठेवल्याचे उघडकीस आले आहे. त्यामुळे शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे भवितव्य अडचणीत आले असून पालक घाबरले आहेत.



या बाबत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी तथा प्रशासक आयुष प्रसाद म्हणाले, ‘जिल्ह्यात कोणत्याही शिक्षण विभागाची परवानगी न घेता २७ शाळा गेल्या तीन वर्षांपासून कार्यरत होत्या. त्या शिक्षण संस्थांबाबत काही माहिती अधिकाऱ्यांमार्फत प्राप्त झाली. त्या माहितीच्या आधारे गटविकास अधिकाऱ्यांनी शाळांमध्ये जाऊन पाहणी केली. त्यानंतर या २७ शाळा अनधिकृत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्या शाळांवर कारवाई केली असून मान्यता काढून घेतली आहे. या अनधिकृत शाळांमध्ये हवेली, पुरंदर, इंदापूर, खेड, मावळ, मुळशी, शिरुर या तालुक्यातील शाळांचा समावेश आहे. सर्वाधिक अनधिकृत शाळा हवेली तालुक्यातील आहेत.’

जिल्ह्यातील २७ शाळांबाबत गटशिक्षण अधिकाऱ्यांकडून अहवाल प्राप्त झाले आहेत. त्यानुसार कारवाईचा भाग म्हणून संबंधित शाळांना आम्ही नोटिसा दिल्या आहेत. त्याला अनेक शाळांनी प्रतिसाद दिला नाही. त्यानंतर त्या शाळा अनधिकृत असल्याने त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे, असे शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांनी स्पष्ट केले.

> “ जिल्ह्यात २७ अनधिकृत शाळा होत्या. त्यात प्रवेश सुरू होते. त्यामुळे पालकांनी त्यांच्या मुलांना या शाळांमध्ये प्रवेश घेतले होते. मात्र आता या शाळा अनधिकृत असल्याने त्या शाळांवर कारवाई करून त्यांची मान्यता काढण्यात आली आहे. त्या शाळांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी घाबरू नये. विद्यार्थ्यांना अन्य शाळेत प्रवेश देण्याची प्रक्रिया करण्यात येईल. विद्यार्थ्यांना त्यांच्या घराच्या जवळच्या शाळेत प्रवेश दिले जातील.
>
> – **आयुष प्रसाद,** मुख्य कार्यकारी अधिकारी

## शॉर्ट न्यूज »

### चिंचवडमध्ये "प्लास्टिक मुक्त शहर विशेष मोहीम'

।चिंचवड। महाईन्यूज ।

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने शहरात 25 मे 5 जून 2022 या कालावधी दरम्यान "प्लास्टिक मुक्त शहर विशेष मोहीम" राबविण्यात येत आहे. या मोहिमेच्या दुस-या दिवशी सकाळी आयुक्त राजेश पाटील यांच्या उपस्थितीत लिंकरोड चिंचवड येथील यशोपुरम सोसायटी परिसरातील मोकळ्या जागेत प्लॉगेथॉन मोहीम पार पडली. सहाय्यक आयुक्त रविकिरण घोडके, क्षेत्रीय अधिकारी अभिजित हराळे, सहाय्यक आरोग्य अधिकारी महादेव शिंदे, महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी यांच्यासह संस्कार प्रतिष्ठान, रोटरी क्लब ऑफ वाल्हेकरवाडी, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था यांचे स्वयंसेवक, नागरिक आदी सहभागी होते. आयुक्त पाटील म्हणाले, मानवी कल्याण आणि वसुंधरेच्या शाश्वत अस्तित्वासाठी सर्वांनी प्लास्टिक मुक्त शहर मोहिमेत सहभागी होऊन ही मोहीम निरंतर चालवावी.

### ठाकरे सरकार कराद्वारे लूट करणारे देशातील पहिल्या क्रमांकाचे सरकार

# ठाकरे सरकारमुळे पेट्रोल-डिझेलच्या महागाईचा महाराष्ट्रात उच्चांक !

### भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांची टीका

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

राज्यातील जनतेच्या हिताची कोणतीच योजना आखण्यात आणि अंमलात आणण्यात महाराष्ट्रातील महाविकास आघाडी सरकार सपशेल अपयशी ठरले असून, पेट्रोल-डिझेलवरील करात कपात केल्याचा गवगवा करून फसवणुकीचा नवा पायंडा पाडणारे ठाकरे सरकार कराद्वारे लूट करणारे देशातील पहिल्या क्रमांकाचे सरकार ठरले आहे, अशी घणाघातील टीका भाजपाचे शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांनी केली.





देशात सर्वाधिक महाग पेट्रोल-डिझेल महाराष्ट्रात असल्याने पेट्रोल डिझेलवरील करामध्ये ५० टक्के कपात करून दारूचा न्याय पेट्रोल डिझेललाही लावलाच पाहिजे, या मागणीही त्यांनी केली आहे.

आमदार लांडगे यांनी बाबत दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे की, जनतेच्या खिशातून हजारो कोटींची लूट केल्यानंतर आता पेट्रोल, डिझेलवरील मूल्यवर्धित करामध्ये ( व्हॅट ) अनुक्रमे २.०८ रुपये व १.४४ रुपय कपातीचा पोकळ गाजावाजा करून ठाकरे सरकारने पुन्हा एकदा जनतेच्या डोळ्यात धुळफेक केली आहे. महागाईने त्रासलेल्या जनतेस दिलासा देण्याऐवजी केंद्राविरुद्धच्या राजकारणात जनतेला वेठीस धरण्याचा ठाकरे सरकारचा डाव उघड झाला असून राज्याच्या करामध्ये ५० टक्के कपात करून जनतेला दिलासा द्यावा. केंद्र सरकारचा इंधनावरील कर केवळ १९ रुपये असताना ठाकरे सरकार मात्र ३० रुपये कर आकारून जनतेचे खिसे ओरबाडत तिजोरी भरत आहे, त्यामुळे राज्यातील पेट्रोल डिझेल दरवाढीस राज्य सरकारच जबाबदार आहे, असेही लांडगे यांनी म्हटले आहे.

#### महाविकास आघाडीचा दुटप्पीपणा

महाराष्ट्रात पेट्रोलवर लिटरमागे ३२.५५ रुपये तर डिझेलवर लिटरमागे २२.३७ रुपये एवढा कर राज्य सरकार आकारते. केंद्र सरकारने कर कपात करून राज्याचा कर कमी करण्याचे आवाहन केल्यानंतरही ठाकरे सरकारने कर कमी केले नाहीत, उलट अनावश्यक वाद घालून राजकारण सुरू ठेवले. एकीकडे महागाईच्या नावाने सत्ताधाऱ्यांनीच निदर्शने करायची आणि दुसरीकडे कर कपात न करता जनतेची लूट सुरूच ठेवायची असा दुटप्पी डाव महाविकास आघाडी खेळत आहे, असेही आमदार लांडगे यांनी म्हटले आहे.

---

### टाळगाव चिखलीतील रामायण मैदानावर इतिहास घडणार

# 'रेकॉर्ड ब्रेक' नोंदणी : अवघ्या तीन तासांत दोन हजार बैलगाडा 'टोकन'

## देशातील सर्वात मोठ्या बैलगाडा शर्यतीची तयारी

पिंपरी । महाईन्यूज

देशातील सर्वात मोठ्या बैलगाडा शर्यतीसाठी अवघ्या तीन तासांत २ हजाराहून अधिक बैलगाडा मालकांनी टोकन नोंदणी केली. एवढ्या मोठ्या प्रमाणात टोकन बूक होणारी ही इतिहासातील पहिली बैलगाडा शर्यत आहे. पिंपरी-चिंचवडमध्ये हा 'रेकॉर्ड ब्रेक'उत्सव होणार असून, शेतकरी, बैलगाडा मालकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे, अशी माहिती जय हनुमान बैलगाडा मंडळाचे अध्यक्ष हनुमंत जाधव यांनी दिली. टाळगाव चिखली येथील रामायण मैदानावर भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे, माजी महापौर नितीन काळजे, माजी महापौर राहुल जाधव यांच्या पुढाकाराने देशातील सर्वात मोठी बैलगाडा शर्यत आयोजित केली आहे. दि. २८ ते ३१ मे २०२२ सकाळी ७ ते सायंकाळी ७ या वेळेत अत्यंत नियोजनबद्ध ही शर्यत होणार



आहे. बैलगाडा शर्यतीत सहभागी होण्यासाठी टोकन बंधनकार केले होते. रामायण मैदानावरील सभागृहात गुरूवारी सकाळी ९ ते १२ या वेळेत टोकन स्विकारण्यात आले. बैलगाडा मालकांनी मोठी गर्दी केली. या टोकनचा 'लकी ड्रॉ' काढून शर्यतीचे नियोजन करण्यात येणार आहे. एका बॉक्समध्ये २ हजार नावांच्या चिठ्ठ्या टाकल्या जातात. त्याद्वारे पहिली चिठ्ठी मिळालेला बैलगाडा पहिल्यांदा धावणार, असे नियोजन केले जाते. टोकनची रक्कम घाटात गाडा जुंपल्यावर परत दिली जाते, असे राहुल ससे यांनी सांगितले. घाट एकूण १२ सेकंदाचा आहे. डिजिटल घड्याळाच्या आधारे किती सेकंदात बैलगाडा शर्यत पूर्ण करतो याची नोंद केली जाते. २ हजार बैलगाडा या घाटात धावणार आहेत. पहिल्या १२० गाडा मालकांना दुचाकी बक्षीस मिळणार आहे. सेमी फायनल आणि फायनलमध्ये धावणाऱ्या बैलगाडा मालकांना जेसीबी, बुलेरो, ट्रॅक्टर आणि रोख पारितोषिक अशा बक्षीसांसाठी शर्यत होईल.

#### परराज्यातूनही शर्यतीला प्रतिसाद...

लक्षवेधी बक्षीसांची मेजवानी असल्यामुळे शर्यतीला देशभरातून प्रतिसाद मिळत आहे. कर्नाटक, आंध्रप्रदेश, तमिळनाडू याठिकाणाहून बैलगाडा मालकांनी टोकन बुक केले आहे. महाराष्ट्रातील सांगली, सातारा, कराड, कोल्हापूर, सोलापूर, जळगाव, जालना, नाशिक, सिन्नर यासह पुणे आणि अहमदनगर जिल्ह्यातील बैलगाडा मालकांनी नोंदणी केली आहे.

#### ... अशी आहे नियमावली

१ बैलगाडा मालकाने एकदा जुंपलेला बैल दुसऱ्या गाड्यामध्ये जुंपल्यास दोन्ही गाडे बाद केले जातील.

२ प्रत्येक बैलाची वैद्यकीय तपासणी करण्यात येईल.

३ जुकाटाखाली आलेला बैल जर खिळ मारुन बाहेर काढला, तर त्या गाड्याचे सेकंद सांगितले जाणार नाही.

४ दि.२८ ते ३१ मे पर्यंत घाटाच्या तळामध्ये बॅरिकेट सिस्टीम केलेली असल्यामुळे फक्त बैलगाडा मालक व जुंपणारे बॅरिकेटच्या आतमध्ये सोडले जातील.

५ बैलगाडा घाटाचा तळ व निशाना जवळील भाग पूर्णपणे रिकामा ठेवण्यात येईल.

#### सुरक्षेचा कडेकोट बंदोबस्त...

बैलगाडा शर्यतीसाठी प्रचंड गर्दी होणार असल्याने बैलगाडा घाटाचा पूर्ण ताबा सुरक्षिततेच्या कारणास्तव पोलीस प्रशासनाकडे देण्यात आला आहे. बैलगाडा पार्किंग व्यवस्था स्वतंत्रपणे केली आहे. टू-व्हीलर आणि फोर व्हीलरसाठी स्वतंत्र पार्किंग व्यवस्था केली आहे. प्रत्येक चौकामध्ये बैलगाडा मालकांसाठी पार्किंग आणि दिशादर्शक फलक लावण्यात आले आहेत. चार दिवस जेवण्याची व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, प्रत्येक गाडामालक आणि बैलगाडा शौकीनांसाठी टी-शर्ट व टोपी देण्यात येणार आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी व महिलांसाठी एल.ई.डी स्क्रिनवर लाईव्ह गाडे पाहण्यासाठी सभागृहामध्ये स्वतंत्र व्यवस्था आहे, असेही संयोजकांनी सांगितले.

## संपादकीय »

# सहाव्या जागेचे त्रांगडे...

***भाजपकडे 106 आमदारांचे संख्याबळ आहे. भाजपच्या स्वतःच्या दोन उमेदवारांच्या विजयासाठी 84 मते लागणार आहेत. उर्वरित 22 मते ही भाजपकडे सहाव्या उमेदवारासाठी अतिरिक्त असणार आहेत.***

महाराष्ट्रातील सद्यस्थितीतील राजकीय पक्षांच्या पक्षीय बलाबलाचा विचार करता कोणत्याही एका पक्षाकडे सहाव्या जागेच्या विजयासाठी आवश्यक असणारी स्वबळावर 42 मते नाहीत ही वस्तुस्थिती आहे, तथापि महाविकास आघाडीमधील शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेस या तीन पक्षांकडे त्यांची एक हमखास निवडून येणारी जागा वगळता दुसऱ्या जागेसाठी जी अतिरिक्त मते या तिन्ही पक्षांकडे शिल्लक राहतात त्यांची बेरीज साधारणपणे 27 ते 28 मतांच्या घरात जाते. याशिवाय महाविकास आघाडीला पाच ते सहा अपक्ष आमदारांची साथ आहे. अशी एकूण बेरीज लक्षात घेतली तर 35 मतांपर्यंत महाविकास आघाडीचा सहावा उमेदवार हा सहजरित्या पोहचू शकतो, मात्र तरीदेखील त्याला निवडून येण्यासाठी आणखी सात मतांची आवश्यकता लागणार आहे. भाजपकडे 106 आमदारांचे संख्याबळ आहे. भाजपच्या स्वतःच्या दोन उमेदवारांच्या विजयासाठी 84 मते लागणार आहेत. उर्वरित 22 मते ही भाजपकडे सहाव्या उमेदवारासाठी अतिरिक्त असणार आहेत. भाजपला पाठिंबा देणाऱ्या अपक्ष आमदारांची संख्या लक्षात घेतली तर भाजप आणि अपक्ष मिळून या दोघांचे संख्याबळ 28च्या पुढे जात नाही. त्यामुळे भाजप आणि अपक्षांच्या बळावरदेखील संभाजीराजे यांना राज्यसभेवर जाणे शक्य दिसत नाही. छत्रपती संभाजीराजे यांच्या हाती शिवबंधन बांधण्याच्या शिवसेनेच्या भूमिकेबद्दल वादविवाद नक्कीच असू शकतात. तसेच ज्या संभाजीराजेंनी भाजपकडून उघडपणे सहाव्या जागेकरिता भाजप उमेदवार म्हणून निवडणूक लढविण्यास नकार दिला, त्यांनी शिवसेनेसारख्या प्रादेशिक पक्षाकडून उमेदवारी का घ्यावी, हा त्यांच्या समर्थकांचा प्रश्न योग्यच आहे.मात्र 1947 साली भारताने जेव्हा स्वातंत्र्य मिळवले तेव्हाच भारतीय संघराज्य हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या राज्यघटनेनुसार चालते. त्यामुळे स्वातंत्र्याबरोबरच राज्यघटनेनुसार देश चालविण्याची जबाबदारीदेखील यामुळे आली. त्यामुळे कोणालाही जर लोकसभा, राज्यसभा अथवा विधानसभा, विधान परिषद येथे निवडून जायचे असेल तर त्याचे नियम पाळणे बंधनकारक आहे. त्यामुळेच संभाजीराजेंना जर राज्यसभेत जायचे असेल तर 42 मतांचा कोटा पूर्ण करणे आवश्यक आहे.



## आनंदी सकाळ

# जिथे वासना संपली, तिथे आनंदच आनंद

वासना भगवंताकडे वळविली की मग आनंदाशिवाय दुसरा कोणता लाभ होणार? खरोखर, वासना ही विस्तवासारखी आहे. ज्या विस्तवाने सुंदर स्वयंपाक करून कढत आणि ताजे अन्न खायला मिळते, तोच विस्तव जर घरावर ठेवला, तर घर जाळून टाकतो. त्याप्रमाणे वासना भगवंताकडे वळली तर माणसाला आनंदरूप बनविते; पण ती जर विषयाकडे वळली तर त्याला दुःखामध्ये लोटते. वासना रोज नवीन नवीन खेळ आपल्याला दाखविते. म्हणजे खेळ जुनेच असतात, पण आपली वासना मात्र नवी असते.

वासना म्हणजे अभिमान किंवा मीपणा, हा मनुष्याचा शत्रू असून तो त्याच्या आनंदावर विरजण घालतो. वासनेमुळे चित्ताला समाधान नाही हे कळत असूनसुद्धा, वासनेचा जोर इतका विलक्षण असतो की तो शेवटच्या श्वासापर्यंत जात नाही. ज्याने वासनेला जिंकले, त्याच्यावर भगवंताची कृपा झाली म्हणून समजावे. वासनेला जिंकायला भगवंताच्या नामात राहण्यासारखा दुसरा उपाय नाही. वासना न ठेवता कर्म करणे याचेच नाव संन्यास. जिथे वासना संपली तिथे आनंदच आहे.

# अन्याय होत असताना एकत्र न येणे ही शोकांतिका...



## भूमिका



सध्या जीवनावश्यक वस्तूंच्या किमती अव्वाच्या सव्वा झाल्या आहेत. महागाईने उच्चांक गाठला आहे, पेट्रोलच्या भावात रोज वेगवेगळे बदल आपण पाहतो. भारतातील आयात-निर्यातीच्या धोरणाबद्दल बोलावे तर अर्थशास्त्रज्ञ सुद्धा गप्प आहेत. बेरोजगारी वर तर बोलू नये हीच अवस्था, आफ्टर कोरोना ची परिस्थिती काही वेगळी नाही. जगण्याची आणि श्वास घेण्याची धडपड सुरू आहे. सर्वसामान्य लोकांच्या जगण्याचे अलीकडच्या काळात कटपिस निर्माण झालेले पहावयास मिळतात. वस्तुस्थितीला वळसा घालून प्रत्येकजण जगतो आहे. वास्तव डोळ्यासमोर उभे असताना वेगळ्याच धुंदीत राजकारण होत आहे. युवकांना हनुमान चालीसा ऐकून आणि वदवून घेऊन त्यांच्या समस्या मिटणार का..? की अयोध्या ला जाऊन आपले प्रश्न मिटणार आहेत..? याचे देखील उत्तर कुणाकडेच नाही.मागच्या आठवड्यामध्ये महाराष्ट्र दुय्यम अराजपत्रित अधिकारी पदाची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दुसरी उत्तरपत्रिका प्राप्त करून दिली. त्या उत्तरपत्रिकेमध्ये एकूण दहा प्रश्न बाद ठरवण्यात आले. तीन ते चार वर्ष विद्यार्थी एका जाहिराती ची वाट पाहतात. या सर्व प्रक्रियेमध्ये पाच वर्ष निघून जातात. परीक्षा दिली जाते त्यानंतर हातात उत्तर पत्रिका येते त्यावेळी आपण दिलेले उत्तर आणि आयोगाचे उत्तर यामध्ये तफावत आढळून येते. आयोग जर एका प्रश्नपत्रिकेत दहा टक्के प्रश्न रद्द करत असेल तर आयोगाच्या तार्किक क्षमतेवर प्रश्नचिन्ह उभे राहते. आपल्याकडे हे सर्रास सुरू आहे. विद्यार्थी ते दहा प्रश्न सोडवून समोर जाण्याचा प्रयत्न करतात परीक्षेमध्ये त्यांचा त्या प्रश्नांसाठी वेळ जातो. परिणामी असे जर होत असेल तर विद्यार्थ्यांनी न्याय मागायचा कुठे. यावर जर तक्रार दाखल केली तर विद्यार्थ्यांना भीती वाटते की, आपण लोकसेवा आयोगाच्या काळ्या यादीत जाऊ शकतो. त्यानंतर अशी तक्रार दाखल केली तर न्यायालयामध्ये सुद्धा वर्षानुवर्ष असे प्रकरण प्रलंबित राहते. दुसऱ्या परीक्षेची तयारी करता येत नाही आणि आहे त्या परीक्षेचा निकाल लावला जात नाही या सर्व प्रक्रियेत होरपळतो तो विद्यार्थी.. इथे आणखी एक गोष्ट सांगावीशी वाटते ती म्हणजे, आम्ही युवक किंवा विद्यार्थी जात, धर्म, पंथ, पक्ष, भाषा अशा अनेक मुद्द्यांवर एकत्र येतो. आंदोलन करतो, पण परीक्षेच्या दृष्टिकोनातून अन्याय होत असेल तर एकत्र येत नाही ही शोकांतिका.

# मुका मोर्चा संबोधणाऱ्याना राजे विसरतील?

**'संभाजी राजे एका जातीचे नेते आहेत. राजकारणात एका जातीचे राजकारण करुन चालत नाही, असे मतही अनेक व्यासपीठांवर राजकीय विश्लेषकांनी मांडले आहे. खरे तर मराठा समाजाचा आजपर्यंत केवळ राजकारणासाठी वापर झाला.**

'संभाजी राजे एका जातीचे नेते आहेत. राजकारणात एका जातीचे राजकारण करुन चालत नाही, असे मतही अनेक व्यासपीठांवर राजकीय विश्लेषकांनी मांडले आहे. खरे तर मराठा समाजाचा आजपर्यंत केवळ राजकारणासाठी वापर झाला. त्यांच्या मूळ दुखण्याकडे राजकारणापलीकडे जाऊन कुणी पाहिले नाही. जमीनदार, मालदार, सरंजामी, सत्ताधारी अशी एक ना अनेक विशेषणे मराठा समाजाला चिकटली आहेत.



राज्यसभेतील खासदारकीच्या बदल्यात शिवबंधन बांधण्याचे अवतान शिवसेनेने छत्रपती संभाजीराजेंना धाडले खरे; परंतु, मराठा आरक्षणासाठी निघालेल्या भव्य मोर्चांना 'मूका मोर्चा' संबोधून समस्त समाजाचा अपमान करणाऱ्या शिवसेनेला राजे विसरतील कसे? म्हणूनच शिवसेनेच्या 'ऑफर'ला लाथ मारत संभाजीराजेंनी तडक मातोश्रीऐवजी कोल्हापूरचा रस्ता धरलेला दिसतो. अर्थात यामुळे राजेंचा आवाज दिल्ली दरबारापर्यंत पोहोचण्याचा मार्ग संकुचित झाला आहे हेदेखील मान्य करावे लागेल. छत्रपती शिवाजी महाराजांचे तेरावे वंशज म्हणून ओळख असलेल्या संभाजी राजेंसाठी छत्रपतींची पदवी हीच खासदारकीपेक्षा मोठी आहे. अपक्ष म्हणून त्यांना पाठिंबा देण्यास अन्य पक्ष तयार असतील तर ठिकच; अन्यथा त्यांना आपल्या स्वराज्य पक्षाच्या माध्यमातून दबाव गट तयार करता येईल. त्यातून समस्त बहुजन समाजाचे प्रश्न दिल्ली दरबारापर्यंत पोहोचवण्याचा प्रशस्त मार्ग त्यांच्यासमोर आहेच. महाराष्ट्रातून राज्यसभेवर गेलेल्या सहा सदस्यांचा कार्यकाळ संपला आहे. त्यामुळे या सहा जागांसाठी येत्या १० जूनला निवडणूक होणार आहे. यापैकी भाजपचे दोन जागांवर तर शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी यांचा प्रत्येकी एक उमेदवार निवडून येऊ शकतो.

## ।। अभंगवाणी ।।



सर्व सुख आम्ही भोगूं सर्व काळ ।
तोडियेलें जाळ मोहपाश ॥१॥
याचसाठी सांडियेले भरतार । रातलों या
परपुरुषाशीं ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज »

### खाऊ आणत असल्याचे सांगून बापाने काढला पळ

। वाशीम । महाईन्यूज । प्रतिनिधी।

मी तुमच्यासाठी काहीतरी खायला घेऊन येतो' असे सांगून एका निर्दयी बापाने उपाशीपोटी असलेल्या आपल्या पोटच्या दोन चिमुकल्यांना जऊळका रेल्वेस्थानकावर सोडून पळ काढल्याची धक्कादायक घटना घडली. सखाराम जाधव रा. धोत्रा जि. हिंगोली असे या बापाचे नाव आहे. मालेगाव तालुक्यातील वरदरी येथे सासुरवाडी असलेल्या सखाराम जाधव हा आपल्या ६ वर्षीय साहिल व ८ वर्षीय आदित्य या मुलांना सोबत घेऊन पत्नीसोबत भांडण करून पुणे येथून घरी धोत्रा येथे आला. तेथून आज सकाळी पूर्णा अकोला पॅसेंजरने चिमुकल्यांसह जऊळका रेल्वे स्टेशनवर उतरला. दोन्ही मुलांना फलाटावर बसवून खाऊ आणण्यासाठी जातो म्हणून निघून गेला. ५ तास उलटूनसुद्धा तो न आल्याने लहानग्या साहिल व आदित्यला अश्रू अनावर झाले.

### संभाजीराजेंची राज्यसभेच्या लढतीतून माघार?

# संभाजीराजेंसाठी 'अब दिल्ली दूर' !

### समीकरणं जुळवताना संभाजीराजेंना करावी लागली कसरत

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

येत्या जुलै महिन्यात महाराष्ट्रातील सहा राज्यसभा खासदारांचा कार्यकाळ संपत आहे. यातील पाच जागांवरील उमेदवारांच्या नावाची यादी अंतिम टप्प्यात आहे. मात्र, सहाव्या जागेवरून राज्यात राजकारण रंगल्याचं पाहायला मिळालं. राष्ट्रपती नियुक्त खासदार म्हणून संभाजीराजे छत्रपती यांची टर्म संपली आहे. आता स्वराज्य नावाच्या संघटनेमार्फत त्यांनी अपक्ष उमेदवारी दाखल करत राज्यातील सर्व आमदारांना पाठिशी उभे राहण्याचे आवाहन केले. राष्ट्रवादीनेही सुरुवातीच्या काळात छत्रपतींना पाठिंबा देणार असल्याचं म्हटलं. मात्र, यावरून



यूटर्न घेत शिवसेनेला पाठिंबा दिला.

सेनेने छत्रपतींना शिवबंधन बांधण्याची ऑफर दिली होती. मात्र राजेंनी ती धुडकावल्याने राज्यसभेचा मार्ग त्यांच्यासाठी अवघड झाला. अखेर सेनेने कोल्हापुरातूनच जिल्हाध्यक्ष संजय पवार यांना उमेदवारी देत खेळी केली. आता या प्रकरणातील मोठी अपडेट समोर आली आहे.

संभाजीराजे राज्यसभेच्या शर्यतीतून माघार घेण्याची शक्यता वाढली आहे. सकाळीच त्यांनी ट्वीट करत माझी बांधिलकी जनतेशी असल्याची पोस्ट केली. यानंतर चर्चा वाढल्या आहेत. मविआच्या आमदारांनी त्यांना पाठिंबा देण्यास असमर्थता दर्शवल्याने त्यांच्यावर ही वेळ ओढावल्याची चर्चा आहे. त्यातच भाजपने देखील त्यांना जाहीर समर्थन दिलेले नव्हतं. त्यामुळे दिल्लीसाठी आकड्यांची समीकरणं जुळवताना संभाजीराजेंना कसरत करावी लागली. अखेर संभाजीराजे यांनी या लढतीतूनच माघार घेणार असल्याचं कळतंय. दरम्यान, संजय राऊत आणि संजय पवार यांनी त्यांचे राज्यसभेचे अर्ज दाखल केले आहेत. उद्या संजय राऊत थेट कोल्हापुरात जाऊन कार्यर्त्यांची भेट घेणार आहेत. तर शनिवारी राऊत यांची सभा पार पडणार आहे.

### सेनेची ऑफर आणि पवारांची खेळी... भाजपचा सस्पेन्स

राज्यसभेच्या सहाव्या जागेसाठी अपक्ष लढणार असल्याचं संभाजीराजेंनी जाहीर करताच शरद पवार यांनी राष्ट्रवादीकडून जाहीर पाठिंबा देत खेळी केली. यानंतर शिवसेनेच्या उमेदवाराला पाठिंबा देणार असल्याचं सांगत राष्ट्रवादीच्या नेत्यानी यू टर्न घेतला. शिवसेनेने राजेंना पक्षप्रवेश करण्याची ऑफर दिली. यातून राजकारण आणखी वेगळ्या वळणावर गेलं. सहावी जागा भाजपच्या गोटातून रिक्त होत आहे.

विकास महात्मे यांच्या जागी चाचपणी सुरू होती. मात्र भाजपला संख्याबळाचं समीकरण साधण्यात घाम गाळावा लागणार असल्याने महाविकास आघाडीला त्यामध्ये सरशी मिळणार आहे. यंदा भाजपच्या जागा कमी झाल्या. शिवसेनेकडे मविआ सरकारमधील सर्वाधिक आमदार आहेत. त्यामुळे राज्यसभेच्या जागेवर सेनेचा नेता जाणार असल्याचं स्पष्ट झालं.

# ओबीसी आरक्षणप्रश्नी भाजपाचा मोर्चा म्हणजे नौटंकी!

### महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांचा घणाघाती हल्ला

मुंबई । महाईन्यूज ।

ओबीसींच्या राजकीय आरक्षणासाठी भारतीय जनता पक्षाने मंत्रालयावर काढलेला मोर्चा हे निव्वळ ढोंग आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील भाजपाचे सरकार राज्यात असतानाच ओबीसींचे राजकीय आरक्षण संपुष्टात आणण्याची सुरुवात झाली आणि त्याला केंद्रातील भाजप सरकारने साथ दिली हे उघड सत्य आहे. त्यामुळे भाजपाला ओबीसींच्या आरक्षणावर बोलण्याचा काहीही अधिकार नाही. आरक्षण संपवणे हेच भाजपा व त्यांची मातृसंस्था आरएसएसचा अजेंडा असून मंत्रालयावरील भाजपाचा मोर्चा म्हणजे केवळ 'नौटंकी' आहे. ओबीसींना आरक्षण मिळावे, असे भाजपा नेत्यांना वाटत असेल तर त्यांनी पंतप्रधान कार्यालयावर मोर्चा काढावा, असा घणाघाती हल्ला महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे



अध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे.

यासंदर्भात बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, मोर्चाविळी भाजपा नेत्यांनी केलेली विधाने ही अत्यंत हास्यास्पद व बालिश होती. सत्तेच्या लालसेने पछाडलेल्या चंद्रकांत पाटील यांनी लोकांना 'मसनात' पाठवण्याची भाषा केली ही मग्रुरी असून भाजपाचे लोकच अशी भाषा वापरू शकतात. ओबीसी आरक्षण संपुष्टात येण्याची सुरुवात झाली तीच मुळी २०१७ साली.

### आता भाजपा 'मगरीचे अश्रू' ढाळतेय

नागपूर जिल्हा परिषदेच्या निवडणुका फडणवीस सरकारने एक साथे परिपत्रक काढून पुढे ढकलल्या आणि प्रकरण चिघळले. नंतर हे प्रकरण न्यायालयात गेले त्यादरम्यान ओबीसी आरक्षण वाचावे म्हणून फडणवीस सरकारने कोणतीही हालचाल केली नाही. पाच वर्षे फडणवीस सरकारने झोपा काढल्या आणि आता मात्र ओबीसी आरक्षणाचे खापर महाविकास आघाडीवर फोडू पहात आहेत. ओबीसींच्या राजकीय आरक्षणाचा खरा मारेकरी भाजपाच असून आता आंदोलन करत 'मगरीचे अश्रू' ढाळत आहे, असा टोलाही नाना पटोले यांनी लगावला.

### आरक्षणाशिवाय निवडणुका घेऊ नयेत

ओबीसींच्या राजकीय आरक्षणाशिवाय निवडणुका घेऊ नयेत हीच काँग्रेस पक्षाची भूमिका आहे आणि त्यासाठी महाविकास आघाडी सरकारही प्रयत्नशील आहे. विधानसभेचा अध्यक्ष असताना मी स्वत: जातीनिहाय जनगणना करावी असा ठराव मांडून तो संमत करून घेतला. जातीनिहाय जनगणना झाली तर असे वाद निर्माणच होणार नाहीत परंतु केंद्रातील भाजपा सरकार त्यावर निर्णय घेत नाही. ओबीसी आरक्षणाच्या आजच्या परिस्थितीस भाजपाच जबाबदार आहे. धनगर समाजाला पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीत आरक्षण देण्याचे आश्वासन देणारा व नंतर पाच वर्ष त्यांना झुलवत ठेवणारा पक्षही भाजपाच आहे. ओबीसींना राजकीय आरक्षण मिळावे ही भाजपा सोडता सर्व राजकीय पक्षांची भूमिका आहे.

# राज्यसभेच्या निवडणुकीपाठोपाठ महाराष्ट्रातल्या दहा विधानपरिषद जागांसाठी निवडणूक जाहीर

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

विधान परिषदेचे 10 सदस्य जुलैच्या पहिल्या आठवड्यात निवृत्त होत आहेत. विधानसभेच्या संख्याबळानुसार भाजपचे चार तर शिवसेना आणि राष्ट्रवादीचे प्रत्येकी दोन उमेदवार निवडून येऊ शकतात. तर कॉंग्रेसचा एक उमेदवार निवडून येऊ शकतो. मात्र दहाव्या जागेसाठी कॉंग्रेसला मतांची गरज असून या जागेसाठी जोरदार लढत होण्याची शक्यता आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते रामराजे नाईक निंबाळकर, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते संजय दौंड, शिवसेनेचे नेते उद्योगमंत्री



सुभाष देसाई, दिवाकर रावते, विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर, सदाभाऊ खोत, विनायक मेटे, सुजितसिंह ठाकूर, प्रसाद लाड हे सदस्य निवृत्त होणार आहे. तर भाजपचे रामनिवास सिंह यांचे निधन झाल्याने एक जागा रिक्त आहे. मात्र यंदा भाजपचे दोन सदस्य कमी होणार आहेत. यामुळे भाजपकडून कुणाला संधी मिळणार आणि कुणाचा पत्ता कट होणार याकडे सर्वांचे लक्ष लागणार आहे.

विधान परिषदेवर निवडून यायचे असेल तर 27 मतांची आवश्यकता आहे. भाजप आणि मित्रपक्ष मिळून संख्याबळ 113 होत आहे. त्यामुळे भाजपच्या सहज चार जागा निवडून येऊ शकतात. त्यामुळेच आता या चार जागांसाठी कुणाची वर्णी लागणार याची उत्सुकता आहे. राष्ट्रवादीचे 54, शिवसेना 56 आणि कॉंग्रेसचे 45 आमदार आहेत. विधानपरिषदेसाठी देखील इच्छुकांनी हालचाली सुरू केल्या आहेत. इच्छुकांनी लॉबिंग करायला सुरुवात केली आहे. एकीकडे प्रवीण दरेकर यांचे नाव जवळपास निश्चित झालेले असताना माजी मंत्री पंकजा मुंडे, चित्रा वाघ, अनिल बोंडे, राम शिंदे, कृपा शंकर सिंग यांचीही नावे चर्चेत आहेत.

## शॉर्ट न्यूज »

### पाकिस्तानातून घुसखोरी करणाऱ्या लष्कर -ए-तोय्यबाचे तीन दहशतवादी ठार

। मुंबई ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

जम्मू- काश्मीरमध्ये दहशतवाद भडकावण्याचा पाकिस्तानकडून वारंवार प्रयत्न सुरु आहे. मात्र त्यांच्या प्रत्येक प्रयत्न भारतीय सुरक्षा दलाकडून हाणून पाडले आहेत. असाच प्रयत्न गुरुवारीही करण्यात आला. कुपवाडा जिल्ह्यातील नियंत्रण रेषेजवळील जुमागुंड गावातून पाकिस्तानातून घुसखोरी करणाऱ्या लष्कर ए-तोय्यबाच्या तीन दहशतवाद्यांना जवानांनी ठार केले आहे. काश्मीरचे आयजीपी विजय कुमार यांनी सांगितले की, ठार झालेले लष्कर ए- तोयब्बाचे तीन दहशतवादी स्थानिक नसून पाकिस्तानी नागरिक होते. काश्मीरमध्ये दोन दिवसांत झालेल्या चकमकीत सहा दहशतवादी ठार झाले आहेत. आज कुपवाडामध्ये मारले गेले तीन दहशतवादी आणि बुधवारी बारामुल्ला चकमकीत जैश-ए-मोहम्मदचे ठार झालेले तीन दहशतवादीही पाकिस्तानचे रहिवासी होते. काश्मीरचे आयजीपी

### इम्रान खान यांची सत्ता गेल्यानंतर तात्काळ निवडणुका जाहीर करण्याची मागणी

# इम्रान खान यांच्या आझादी मोर्चाला हिंसक वळण!

### समर्थकांची पोलिसांसोबत बाचाबाची

। लाहोर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांची सत्ता गेल्यानंतर तात्काळ निवडणुका जाहीर कराव्यात अशी मागणी करत आहेत. या मागणीसाठी त्यांनी आझादी मोर्चाचे आयोजन केले होते. या मोर्चात सहभागी झालेल्या समर्थकांनी हिंसेचा मार्ग अवलंबल्यामुळे मोर्चाला हिंसक वळण लागले. अनेक ठिकाणी समर्थकांनी पोलिसांसोबत बाचाबाची केली आहे. तसेच अनेक ठिकाणी पोलीस आणि समर्थकांमध्ये हाणामारी झाली आहे.

इस्लामाबादमध्ये आंदोलकांनी गाड्या आणि झाडांना आग लावली आहे. रावळपिंडी, कराची, लाहोर आणि खैबर पखुनख्वा येथे झालेल्या गोंधळानंतर पाकिस्तान तहरीक-ए-इन्साफच्या समर्थकांनी राजधानी इस्लामाबादमध्ये हिंसाचाराचा अवलंब केला. इस्लामाबादमध्ये रॅली काढण्याची घोषणा इम्रान खान यांच्याकडून करण्यात आली आहे.



पाकिस्तानमध्ये लवकरच निवडणुका घ्यावात अशी मागणी माजी पंतप्रधान इम्रान खान यांनी केली आहे. आझादी मोर्चातील आंदोलकांनी शहरात जाळपोळ केली आहे. यानंतर परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी सुरक्षा दल आणि पोलिसांचा फौजफाटा तैनात करण्यात आला आहे.

झाडे आणि वाहनांना लावलेली आग आटोक्यात आणण्यासाठी प्रशासनाला अग्निशमन दलाच्या गाड्या सज्ज करण्यात आल्या आहेत. तसेच रेड झोनमध्ये कोणालाही प्रवेश करण्याची परवानगी देण्यात येणार नाही, रेड झोनमध्ये प्रवेश केल्यास कारवाई करण्यात येईल. अनेक ठिकाणी पोलिसांना बळाचा वापर न करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच आंदोलकांना शांततेचे आवाहन करण्यात आले आहेत. असे इस्लामाबाद पोलीस महानिरीक्षकांनी ट्विट केलं आहे.

### लष्कराची मदत घेण्याचा निर्णय

इस्लामाबादमधील परिस्थिती गोंधळात पडली. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी आणि तेथे असलेल्या सरकारी कार्यालयांचे संरक्षण करण्यासाठी सरकारने लष्कराची मदत घेण्याचा निर्णय घेतला. आणि अतिशय संवेदनशील म्हणजे रेड झोनमध्ये बदलले. सरकारने एका अधिसूचनेत म्हटले आहे की, परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी संविधानाच्या कलम 245 अंतर्गत लष्कराला पाचारण करण्यात आले आहे.

### इम्रान खान इस्लामाबादपासून 50 किमी अंतरावर

इम्रान खान आंदोलनानंतर इस्लामाबादपासून ५० किमीच्या अंतरावर आपल्या समर्थकांसह थांबले आहेत. शाहबाज शरीफ सरकार सार्वत्रिक निवडणुकांची तारीख जाहीर करेपर्यंत ते आणि त्यांचे समर्थक राजधानीतील डी-चौक रिकामा करणार नाहीत. आम्ही पंजाबमध्ये प्रवेश केला आहे आणि इंशाअल्लाह इस्लामाबादच्या दिशेने जात आहोत. सरकारची दडपशाही आणि फॅसिझम आपला मोर्चा थांबवू किंवा रोखू शकत नाही असे इम्रान खान यांनी म्हटलं आहे.

# आफ्रिकेच्या सेनेगलमधील हॉस्पिटलमध्ये भीषण आग दुर्घटना!

### 11 नवजात बालकांचा होरपळून मृत्यू

। सेनेगल सिटी ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

आफ्रिकेतील सेनेगल या शहरात भीषण आगीची घटना घडली आहे. सेनेगलच्या (Senegalese) तिवौने शहरातील एका रुग्णालयात लागलेल्या आगीत 11 नवजात बालकांचा होरपळून मृत्यू झाला आहे. याबाबतची माहिती सेनेगलचे अध्यक्ष मॅकी सॅल यांनी दिली आहे.

सेनेगलच्या तिवौने शहारातील हॉस्पीटलमध्ये भीषण आगीच्या दुर्घटनेतील मृत्यूमुळे शहरात शोककळा पसरली आहे. यावर अध्यक्ष मॅकी सॅल म्हणाले की



“मी नुकतीच एक अतिशय दुःखद आणि निराश करणारी बातमी ऐकली. तिवौने येथील एका सरकारी रुग्णालयातील नवजात शिशु विभागात लागलेल्या आगीत 11 नवजात बालकांचा होरपळून मृत्यू झाला आहे. या आगीत मृत्यू झालेल्या बालकांच्या माता आणि कुटुंबियांप्रती मी मनापासून सहानुभूती व्यक्त करतो.

### शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागल्याची प्राथमिक माहिती

सेनेगाली राजकारणी डिओप सी यांच्या म्हणण्यानुसार, तिवौनेच्या वाहतूक केंद्रातील मामे अब्दु अझीझ सी दबाख हॉस्पिटलमध्ये ही भीषण घडला घडली. शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागल्याची प्राथमिक माहिती आहे. मात्र आगीच्या नेमक्या कारणाचा तपास सुरू असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे. आग कुठून लागली याचा शोध घेण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे. सेनेगलच्या इतिहासातील ही सर्वात मोठी आग आहे. गेल्या वर्षीही सेनेगलमधील एका रुग्णालयाच्या नवजात शिशु वॉर्डमध्ये आग लागली होती, ज्यामध्ये चार मुलांचा मृत्यू झाला होता.

# बडगाममध्ये टीव्ही अभिनेत्रीची गोळ्या घालून हत्या

। जम्मू । महाईन्यूज ।

जम्मू काश्मीरमध्ये दहशतवाद्यांनी थैमान घातलं आहे. मध्यवर्तीय काश्मीरच्या बडगाम जिल्ह्यात हुशरु येथे राहणाऱ्या टीव्ही अभिनेत्रीवर दहशतवाद्यांनी हल्ला (Terrorists fired) केला आहे. अभिनेत्री अमरीन भटची घरात घुसून हत्या करण्यात आली आहे. या हल्ल्यात १० वर्षांचा पुतण्या गंभीर जखमी झाला आहे. दहशतवाद्यांनी



हल्ला केल्यानंतर पळ काढला आहे. अभिनेत्रीवर बेछूट गोळीबार करण्यात आला आहे. घटनेनंतर पोलिसांनी तात्काळ तपास सुरु केला असून दहशतवाद्यांचा शोध घेत आहेत.

अभिनेत्री अमरीन भट तिचे व्हिडिओ इन्स्टाग्राम आणि टिकटॉकवर पोस्ट करत होती. श्रीनगर दूरदर्शन केंद्रावरून प्रसारित झालेल्या काही मालिकांमध्ये आणि काही काश्मिरी गाण्यांच्या अल्बममध्ये अमरीनने काम केले आहे. बडगामच्या चादूपारामध्ये अमरीनचे घर आहे. घरात असताना दहशतवाद्यांनी गोळीबार केला आहे. तिला रुग्णालयात दाखल केल्यानंतर डॉक्टरांनी मृत घोषित केले. तसेच १० वर्षांच्या पुतण्याला गोळी लागली असून तो गंभीर जखमी झाला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार अमरीनवर लष्कर-ए-तैयबाच्या दहशतवाद्यांनी हल्ला केला आहे. हल्ला करणाऱ्या तीन दहशतवाद्यांची ओळख पटली आहे.

# 'हीरोपंती 2' चित्रपट लवकरच ॲमेझॉन प्राईमवर पाहायला मिळणार



बॉलिवूड अभिनेता टायगर श्रॉफ आणि अभिनेत्री तारा सुतारियाचा 'हीरोपंती 2' चित्रपट मागील काही दिवसांपूर्वी प्रदर्शित झाला होता. या चित्रपटाने प्रदर्शनाच्या पहिल्या दिवशी 7.5 करोडची कमाई केली , मात्र त्यानंतर या चित्रपटाला प्रेक्षकांकडून फारशी पसंती मिळाली नाही. त्यामुळे हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर फारशी कमाई करू शकला नाही, चित्रपटगृहानंतर आता हा ॲमेझॉन प्राईमवर रिलीज होण्यासाठी सज्ज झाला आहे. येत्या 27 मे रोजी 'हीरोपंती 2' ॲमेझॉन प्राईमवर रिलीज होणार आहे.

या चित्रपटामध्ये टायगर श्रॉफने बबलू ही भूमिका साकारली आहे. जो सायबर क्राइमसोबत लढत आहे. या चित्रपटात त्याची टक्कर लैला नावाच्या एका मास्टरमाइंड सोबत होते. ही खलनायकाची भूमिका अभिनेता नवाजुद्दीन सिद्दीकीने साकारली आहे. तारा सुतारियाने चित्रपटात टायगरच्या प्रेमीकेची भूमिका साकारली आहे.

**या चित्रपटामुळे 'हीरोपंती 2' झाला फ्लॉप**

टायगरचा 'हीरोपंती 2' रिलीज झाला त्याच काळात 'केजीएफ' चित्रपट सुद्धा रिलीज झाला होता. केजीएफ ने बॉक्स ऑफिसवर बॉलिवूडला सुद्धा मागे टाकलं आहे. टायगर श्रॉफ आता येत्या काळात 'गणपत' या चित्रपटात दिसणार आहे. या चित्रपटात अभिनेत्री कृति सेनन सुद्धा दिसणार आहे. टायगर आणि कृतिने 'हीरोपंती' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये एकत्र पदार्पण केलं होतं. शिवाय टायगर 'बागी 2' मध्ये दिसणार आहे.

# अपूर्वा नेमळेकरचा खासगी आयुष्याबद्दल मोठा खुलासा...



'रात्रीस खेळ चाले' या मालिकेमुळे अभिनेत्री अपूर्वा नेमळेकर प्रसिद्धीच्या शिखरावर पोहोचली. या मालिकेत अपूर्वाने साकारलेली शेवंता ही भूमिका तुफान गाजली. ती मालिका संपल्यानंतर लगेचच अपूर्वाला 'तुझं माझं जमतंय' ही दुसरी मालिका मिळाली होती. या मालिकेतली तिची पम्मी ही भूमिकाही प्रेक्षकांना आवडली, पण काही कारणामुळं तिनं ही मालिका देखील सोडली. त्यानंतर ती ऐतिहासीक मालिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला आली. अपूर्वाच्या अभिनयासाठी तिचं नेहमीच कौतुक होत आलं आहे. परंतु तिनं तिच्या खासगी आयुष्याबद्दल बोलणंही नेहमीट टाळलं. पण सोशल मीडियावरील एका प्रश्न आणि उत्तरांच्या सेशनमध्ये तिनं नुकताच तिच्या खासगी आयुष्याबद्दल मोठा खुलासा केला आहे. ASK ME ANYTHING या सेशनमध्ये अपूर्वानं चाहत्यांच्या अनेक प्रश्नांची मनमोकळे पणानं उत्तरं दिली. एका चाहत्यानं तिला रिलेशनशीप स्टेटस विचारलं त्या प्रश्नाचंही तिनं खरंखरं उत्तर दिलं. एका चाहत्यानं अपूर्वाला तू सिंगल आहे की मॅरिड असा प्रश्न विचारला.

# मुक्ता बर्वेच्या 'वाय' चित्रपटाचे पोस्टर प्रेक्षकाच्या भेटीला



गेल्या आठवड्यात मराठी चित्रपट क्षेत्रातील अनेक दिग्गजांनी ज्या चित्रपटाला आपला ' पाठिंबा ' दर्शविला, त्या ' वाय ' या मराठी चित्रपटाचे पोस्टर अखेरीस प्रेक्षकांच्या भेटीस आले आहे. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या या चित्रपटाच्या पोस्टरची सध्या सोशल मीडिया वर बरीच चर्चा आहे.

या पोस्टरमध्ये मुक्ता बर्वे एका आक्रमक अंदाजात हातात मशाल घेऊन लढताना दिसत आहे. तिचा हा लढा नेमका कोणासाठी आणि का आहे, या आणि अशा अनेक प्रश्नांची उत्तरे लवकरच प्रेक्षकांना कळणार आहेत. या चित्रपटात मुक्ता बर्वे सोबत मराठी चित्रपटसृष्टीतील अनेक प्रथितयश कलाकार आहेत. मात्र सध्या तरी त्यांची नावे गुलदस्त्यात आहेत.

चित्रपटाबद्दल दिग्दर्शक अजित सुर्यकांत वाडीकर म्हणतात, "या चित्रपटाच्या प्रमोशनच्या निमित्ताने सुरू केलेल्या उपक्रमाला मान्यवर कलाकार, विविध क्षेत्रातील दिग्गज तसेच सर्वसामान्यांनीही पाठिंबा दिला आहे. अगदी राजकीय नेतेही त्यात मागे नाहीत. खुर्चीला खिळवून ठेवतानाच प्रेक्षकांना अंतर्मुख करणारा हा थरारपट मराठीतील पहिलाच हायपरलिंक चित्रपट असेल. या चित्रपटाच्या निमित्ताने पहिल्यांदाच ' हायपरलिंक ' हा मराठी चित्रपटाचा नवीन आकृतिबंध प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे."

कंट्रोल एन प्रॉडक्शन निर्मित या चित्रपटाची कथा अजित सुर्यकांत वाडीकर यांची असून पटकथा आणि संवाद अजित वाडीकर,स्वप्नील सोज्वळ

# सोलापूरचा अक्षय इंडीकर आता करणार धर्मा प्रॉडक्शनसोबत काम

मुंबई- 'उदाहरणार्थ नेमाडे', 'त्रिज्या', 'स्थलपुराण' अशा अत्यंत वेगळ्या अशा मराठी सिनेमांचं दिग्दर्शन करत सोलापूरच्या अक्षय इंडीकर यानं स्वतःची ओळख निर्माण केली आहे. अक्षयच्या कामाची चर्चा, त्याच्या कामाची दखल घेत त्याचं कौतुक आंतरराष्ट्रीय पातळीवर करण्यात आलं. आता अक्षय बॉलिवूडमध्ये स्वतःची ओळख निर्माण करण्यासाठी सज्ज झाला आहे. बॉलिवूडमधील प्रसिद्ध आणि लोकप्रिय निर्माता-दिग्दर्शक करण जोहर याच्या धर्मा प्रॉडक्शनसाठी काम करण्याची संधी अक्षयला मिळाली. त्याला मिळालेल्या या संधीचा आनंद अक्षयनं फेसबुकवर पोस्ट करत व्यक्त केला आहे.

धर्मा प्रॉडक्शनचा सर्वेसर्वा असलेल्या करण जोहर यानं काल त्याचा ५० वा वाढदिवस साजरा केला. करणच्या वाढदिवसाचं औचित्य साधत अक्षयनं त्याला खास पोस्ट शेअर करत शुभेच्छा दिल्या आहेत.याच पोस्टमधून अक्षयनं तो करण जोहर आणि त्याच्या धर्मा प्रॉडक्शनबरोबर काम करणार असल्याची आनंदाची बातमी शेअर केली.



# 'कभी ईद कभी दिवाली' चित्रपटामध्ये जगपति बाबूची साउथ सुपरस्टारची एन्ट्री

सलमान खानच्या 'कभी ईद कभी दिवाली' या बहुचर्चित चित्रपटाबाबत गेल्या अनेक दिवसांपासून नवनवीन अपडेट समोर येत आहेत. गेल्या काही दिवसांपूर्वी या चित्रपटातील काही अभिनेते चित्रपटातून बाहेर पडले होते. मात्र आता सलमान खानच्या 'कभी ईद कभी दिवाली'मध्ये एका टॉलिवूड अभिनेत्याची एन्ट्री झाली आहे. सलमान खानच्या 'कभी ईद कभी दिवाली' चित्रपटामध्ये आता टॉलिवूडचा सुप्रसिद्ध अभिनेता जगपति बाबूची एन्ट्री झाली असून जगपति बाबू या चित्रपटात खलनायकाची भूमिका साकारताना दिसणार आहे. जगपति बाबू शिवाय या चित्रपटात टॉलिवूडच्या दोन कलाकारांचा सहभाग आहे, यामध्ये अभिनेत्री पूजा हेगडे आणि अभिनेता व्यंकटेश हे दोघे असून चित्रपटात यांच्या महत्त्वाच्या भूमिका असणार आहेत. सूत्रांच्या मते सलमान खान चित्रपटाच्या कास्टींगकडे पुरेपुर लक्ष देत आहे.



खरंतर जगपति बाबूला सलमान दबंग ३ मध्ये खलनायकाच्या भूमिकेसाठी कास्ट करण्याची इच्छा होती मात्र त्यावेळी काही अडचणींमुळे चित्रपटात त्यांचा सहभाग होऊ शकला नाही, मात्र यावेळी सलमान खानने जेव्हा 'कभी ईद कभी दिवाली'साठी जगपति बाबूंना विचारले तेव्हा ते लगेच हो म्हणाले. 'कभी ईद कभी दिवाली' चित्रपटाला एका तगड्या खलनायकाचा शोध होत, जो चित्रपटात सलमान आणि व्यंकटेशला तगडी फाइट देऊ शकेल. इतकचं नव्हे तर या चित्रपटात अभिनेत्री शहनाज गिल सुद्धा दिसून येणार आहे. या चित्रपट ३० डिसेंबर २०२३ रोजी प्रदर्शित होणार आहे.

## शॉर्ट न्यूज »

### संघ हरला पण लोकेश राहुलने रचला इतिहास

**नवी दिल्ली । महाईन्यूज**

यंदाच्या हंगामात लोकेश राहुलच्या नेतृत्वाखालील लखनौ सुपर जायंट्स (LSG) चा प्रवास बुधवारी संपुष्टात आला. प्ले ऑफच्या एलिमिनेटर सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने (RCB) लखनौचा 14 धावांनी पराभव केला. या पराभवानंतरही राहुलने IPLच्या इतिहासात एक मोठा विक्रम केला. लीगच्या सर्वाधिक 4 हंगामात 600 किंवा त्याहून अधिक धावा करणारा तो पहिलावहिला खेळाडू ठरला. त्याने यादीत विराट कोहली, ख्रिस गेल आणि डेव्हिड वॉर्नरसारख्या दिग्गजांना मागे टाकले.

एलिमिनेटर सामन्यात बंगलोर विरुद्धच्या 208 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना लखनऊ संघाचा कर्णधार लोकेश राहुलने संथ खेळी केली. त्याने 58 चेंडूत 79 धावांची खेळी खेळली. त्याचा स्ट्राइक रेट 136.21 इतका होता. पण तो स्ट्राईक सामन्याच्या दृष्टीने योग्य नव्हता. राहुलची संथ खेळी लखनौच्या पराभवाचे कारण ठरली. राहुलने आपल्या खेळीत 5 षटकार आणि 3 चौकार लगावले.

### व्हायरल झाला शिखर धवनला घरातील मारहाण करतानाचा व्हिडिओ

# बाप रे बाप ! शिखर धवनला वडिलांकडून मारहाण!

### आधी कानाखाली मारली मग लाथा बुक्क्यांनी मारहाण केली

**। नवी दिल्ली । महाईन्यूज ।**

आयपीएल २०२२ च्या सुरुवातीला पंजाबच्या संघाने त्यांच्या चाहत्यांना सुखद धक्का देत उत्तम कामिगिरी केली. याच कामगिरीमुळे आता पहिल्यांदाच पंजाबचा संघ किमान अंतिम फेरीपर्यंत तरी पोहोचेल अशी आशा चाहत्यांना होती. मात्र मालिकेच्या मध्यापर्यंत पंजाबच्या संघाचा ट्रॅक चूकला आणि नेहमीप्रमाणे पंजाबचा संघ क्वालिफायर सामन्यांआधीच बाहेर पडला. मयंक अग्रवालच्या नेतृत्वाखाली खेळताना पंजाबच्या संघाला प्लेऑफच्या आधीच गाशा गुंडाळावला लागला. यंदा शिखर धवन पंजाबकडून खेळताना दिसला. मात्र त्याच्या खेळामध्ये सातत्याचा आभाव होता त्यामुळेच त्याच्या चाहत्यांची यंदाच्या पर्वात निराशाच झाली. शिखर धवनने आयपीएलदरम्यान आपल्या सहकारी खेळाडूंसोबत धमाल केल्याचं पहायला मिळालं. अनेकदा धवन मजेदार रील्स तयार करुन इन्स्टाग्रामवर शेअर करायचा. मालिकेमधून बाहेर पडल्यानंतर धवनने एक नवीन रील शेअर केला असून त्यामध्ये त्याचे वडील त्याला लाथा-बुक्क्यांनी मारहाण करताना दिसत आहे. शिखरने शेअर केलेल्या या व्हिडीओत आधी त्याचे वडील त्याच्या कानाखाली मारतात. बुक्क्यांनी मारहाण करुन जमीनीवर पाडतात आणि मग लाथा मारताना दिसत आहेत. या सर्व प्रकारादरम्यान धवनच्या वडिलांच्या आजूबाजूचे लोक त्यांना थांबवण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत.



☛ शिखर धवनने हा मजेदार व्हिडीओ शेअर करताना कॅप्शनमध्ये यासंदर्भात मजेदार वाक्य लिहिलंय. “आमचा संघ नॉक आउट फेरीसाठी पात्र ठरला नाही म्हणून माझ्या वडिलांनी मलाच नॉक आउट केलं,” अशी कॅप्शन हा व्हिडीओ शेअर करताना धवनने दिलीय. धवनच्या या व्हिडीओवर ५ हजार ८०० हून अधिक कमेंट्स आल्या असून हा व्हिडीओ अनेकांच्या चांगलाच पसंतीस पडलाय. या व्हिडीओ पोस्टला ४ लाख ९६ हजारहून अधिक लाइक्स आहेत.

### इंडियन प्रीमियर लीग क्रिकेट :

# माझ्याबाबतच्या चर्चेत लोकांना रस - हार्दिक पंड्या

**। कोलकाता। महाईन्यूज ।**



आयपीएल २०२२ च्या सुरुवातीला पंजाबच्या संघाने त्यांच्या चाहत्यांना सुखद धक्का देत उत्तम कामिगिरी केली. याच कामगिरीमुळे आता पहिल्यांदाच पंजाबचा संघ किमान अंतिम फेरीपर्यंत तरी पोहोचेल अशी आशा चाहत्यांना होती. मात्र मालिकेच्या मध्यापर्यंत पंजाबच्या संघाचा ट्रॅक चूकला आणि नेहमीप्रमाणे पंजाबचा संघ क्वालिफायर सामन्यांआधीच बाहेर पडला. मयंक अग्रवालच्या नेतृत्वाखाली खेळताना पंजाबच्या संघाला प्लेऑफच्या आधीच गाशा गुंडाळावला लागला. यंदा शिखर धवन पंजाबकडून खेळताना दिसला. मात्र त्याच्या खेळामध्ये सातत्याचा आभाव होता त्यामुळेच त्याच्या चाहत्यांची यंदाच्या पर्वात निराशाच झाली.

शिखर धवनने आयपीएलदरम्यान आपल्या सहकारी खेळाडूंसोबत धमाल केल्याचं पहायला मिळालं. अनेकदा धवन मजेदार रील्स तयार करुन इन्स्टाग्रामवर शेअर करायचा. मालिकेमधून बाहेर पडल्यानंतर धवनने एक नवीन रील शेअर केला असून त्यामध्ये त्याचे वडील त्याला लाथा-बुक्क्यांनी मारहाण करताना दिसत आहे.

☛ शिखरने शेअर केलेल्या या व्हिडीओत आधी त्याचे वडील त्याच्या कानाखाली मारतात. त्यानंतर त्याला बुक्क्यांनी मारहाण करुन जमीनीवर पाडतात आणि मग लाथा मारताना दिसत आहेत. या सर्व प्रकारादरम्यान धवनच्या वडिलांच्या आजूबाजूचे लोक त्यांना थांबवण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत. यामध्ये एकजण पोलीसांच्या वेशात असल्याचंही दिसतंय. धवनने त्याच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवर हा व्हिडीओ शेअर केला आहे. आता तुम्हाला खरोखरच धवन बाप-बेट्यांमध्ये काही वाद झाला का असं वाटत असेल तर थांबा. कारण हा व्हिडीओ धवनने केवळ मनोरंजन म्हणून बनवलाय.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही